FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.-1

ASSTT. COMM... ANTI-CORR...

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला. प्र. वि., पहिली खबर क्र. FIR No. ८४ वर्ष Year २०१५, दिनांक Date ४/१२/२०१५

2. (i) अधिनियम Act लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act १९८८, कलमे Sections ..........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day रविवार, तारीख पासून Date from २/१२/१५, वेळ Time ०७:२४, तारीख पर्यंत Date to ३/१२/१५, वेळ Time २२:१४

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date ३/१२/२०१५ वेळ Time १८:२० वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १०/१५, तारीख Date ४/१२/२०१५ वेळ Time ०९:५४ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. पोलीस अधिकारी कक्ष, वाकोला पो ठाणे, मुंबई, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ..........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name .........., ठिकाणाचे नंबर No. if any .........., गल्ली Ward .........., रस्त्याचे नाव Name of road ..........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place .........., गाव Village .........., पोस्ट Post .........., तालुका Taluka .........., जिल्हा Distt. .........., राज्य State ..........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station .........., तालुका Taluka .........., जिल्हा Distt. .........., राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name राजू सोमा कुचीकोरवे (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name सोमा कुचीकोरवे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9702645113
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. .......... दिल्याचा दिनांक Date of Issue .......... दिल्याचे ठिकाण Place of Issue .......... (f) व्यवसाय Occupation ..........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste कैकाडी, जनजात Sub-Caste ..........
   (h) पत्ता : Address : .......... गल्ली / सर्वे नं. Ward .......... घर / नाव नंबर House/Name No. .......... फोन /मो. नंबर Phone/M. No. .......... पॅन नं. Pan No. .......... वोटर्स नं. Card No. ..........
   रस्त्याचे नाव Road .......... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place दुर्गामाता मंदिर, गल्ली नं. ०४, गाव Village कलिना, पोस्ट Post .........., सांताक्रुझ (पू) मुंबई P. Stn.
   तालुका Taluka .......... जिल्हा Distt. .......... राज्य State .......... सध्याचा पत्ता Present Address ..........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   पांडुरंग गणपत पिंगे वय ५६ वर्षे
   धंदा - नोकरी (सहाय्यक पोलीस निरीक्षक) वाकोला पोठाणे,
   रा. - तीन डोंगरी पोलीस अधिकारी वसाहत
   एम-०९ दुसरा मजला, गोरेगाव (प) मुंबई

क

Scanned by CamScanner

तक्रारदाराने फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — नाकाई
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील तक्रारदार यांचेविरुद्ध अकोला पो.स्टे येथे गुन्हा नोंद आहे. सदर गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांना मदत करणेकरिता आरोपी लोकसेवक पांडुरंग गणपत पिठे यांनी दि 2/12/2018 रोजीच्या पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे रू 20,000/- इतक्या लाचेची मागणी केली तदेनू दि 3/12/2018 रोजीच्या सापळा कारवाईमध्ये रु. 20,000/- लाचेच्या रकमेपैकी रु 10,000/- लाच स्विकारली म्हणून त्यांचे विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारणा 2018) अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

दिपक जाधव, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

—

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन — , जिल्हा — , राज्य ,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. .............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to —— (3) Transferred to P.S ......................................., District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. RASURS (signature)
तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station (signature)
संपूर्ण नाव Name .... दिपक जाधव
पदनाम Rank .......... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ...........................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

यानीके तक्रारदार नामे राजू सोमा कुचीकोरवे वय ३० वर्षे, रा.ठि.- दुर्गामाता मंदिर गल्ली नं ०४, कलिना, सांताकुझ (पूर्व) मुंबई यांच्या स्वतःच्या पानावर फिर्यादी जबाब संगणकीकृत केल्या वरून तर्फे गुन्हयाची पहिली खबर नोंदविण्यात यावी.

आमस

(दिपक जाधव)
पोलीस निरीक्षक
का. प्रभा. कुर्ला

RAJU S.K

जबाब दि. ०३/१२/२०१८

श्री. राजु सोमा कुचिंकोरवे, वय ३७ वर्षे, धंदा– इस्टेट एजंट, राहि– कलिना कुचिंकोरवे नगर, दुर्गामाता मंदिर, गल्ली न. ४ समोर, कलिना, सातांकुझ, पू, मुंबई ९८ मो.क्र. ९७०२६४५११३

....

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी माझे जन्मापासुन आईवडील, भाऊ नामे अर्जुन, पत्नी सौ. संगिता, मुलगा कु. साईल, मुलगी गिरीषा यांचेसह राहावयास आहे. मी मागील ५ वर्षापासुन बी.एम. सी. मध्ये कंत्राट पध्दतीवर नोकरी करीत असुन इतर वेळी इस्टेट एंजट म्हणुन काम करतो. त्यावर माझे कुटूंबियाचा उदरनिर्वाह चालतो.

मी राहत असलेली खोली ही माझे वडील नामे श्री. सोमा यल्लपा कुचिंकोरवे यांचे नावे आहे. मी सन २०१० मध्ये श्री. डेनिस मार्टिस यांचेकडून रु. ४,००,०००/– किंमतीस घर नं. १८, कलिना कोलेवरी व्हिलेज, पहिला माळा, सांताकुझ (प), मुंबई हि खोली विकत घेतली आहे. सदरची खोली ही रात्री झोपण्यासाठी वापरतो. सदरची खोली ही माझी पत्नी नामे सौ. संगिता राजु कुचिंकोरवे हिचे नावे केली असुन, सर्व कागदपत्रे तिचे नावे आहेत.

मागील चार ते पाच दिवसापासुन माझी सासु श्रीमती सामाका यल्लपा दगडे व मेव्हुनी सौ. राजश्री श्रावण पवार यांचेबरोबर माझे पत्नीचे नावे असलेल्या खोलीचे मालकी हक्काबाबत वादविवाद चालु आहे. दि. ३०/११/२०१८ रोजी सायंकाळी ०७.३० वा मी माझे विकत घेतलेल्या खोलीत असताना माझी सासु व मेव्हुनी आली. त्यानी खोली खाली करण्याबाबत माझी पत्नी व माझे बरोबर वादविवाद चालु केला. त्यावेळी घरात माझी पत्नी, सासु व एक इसम नामे लालु हे असताना माझी मेव्हुनी माझे अंगावर धावुन आली. त्याचवेळी तीने तुला दाखवतो असे सांगुन अंगावरील कपडे स्वत: फाडुन घेतले. त्यांनतर ती खोलीत असलेली शिडी उतरताना लोंखडी ग्रिलचा हुक पाठीला लागला. त्यामुळे तीचे पाठीस दुखापत झाली. त्यानंतर तीने वाकोला पोलीस ठाणे येथे जावुन माझे विरुध्द तक्रार दिली.

दि. ०१/१२/२०१८ रोजी वाकोला पोलीस ठाणे येथुन हवालदार खैरमोरे यांनी मला फोन करुन वाकोला पोलीस ठाणे येथे बोलाविले. सदर दिवशी मी बाहेर असल्याने पोलीस ठाणेस गेलो नाही. दि. ०२/१२/२०१८ रोजी पहाटे ०४.०० वा. माझे घरी पोलीस आले व मला वाकोला पोलीस ठाणे येथे घेवुन आले. त्यानंतर मला वाकोला पोलीस ठाणेचे अधिकारी एपीआय पिठे यांचे समक्ष हजर केले असता, त्यांनी माझेकडे विचारपुस केली. त्यावेळी त्यानी मला " तु मेव्हुनीला का मारले" अशी विचारणा केली. तेव्हा मी मेव्हुनीला मारले नसुन, शिडी उतरताना तीला ग्रिलचा लोंखडी हुक लागुन जखम झाली आहे असे सांगितले. एपीआय पिठे यांनी मला माझे मेव्हुनीच्या उपचाराची कागदपत्रे दाखविली. त्यामध्ये तीला फॅक्चर असल्याचे सांगितले व मला पोलीस ठाणेत बसवुन ठेवले. सकाळी ०७.०० वा. मी त्यांना घरी जावुन येतो असे विचारले असता, त्यांनी मला माझे विरुध्द वाकोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला असल्याचे सांगितले. त्यानंतर मी ०७.१५ वा. एपीआय पिठे साहेब यांना पुन्हा घरी जावुन येवु का? असे विचारले असता, त्यांनी मला घरी सोडतो. परंतु तुला रु. २०,०००/– दयावे लागतील असे सांगुन, रु. २०,०००/– ची मागणी करुन त्यांनी मला ०७.४५ वा. पर्यत पोलीस ठाणेस परत येण्यास सांगितले. व येताना त्यांनी पैसे घेवुन येण्यास सांगितले.

मी एपीआय पिठे साहेब यांच्या सांगणे प्रमाणे घरी जावुन पुन्हा त्याचदिवशी सकाळी ०७.४५ वा. पोलीस ठाणेस आलो. येते वेळी रोख रु. ४,०००/– घेवुन आलो होतो. त्यावेळी एपीआय पिठे साहेब हे झोपलेले होते. मी त्यांना आवाज देवुन उठवले. ते उठले व त्यांनी माझेकडे पैश्याबाबत पुन्हा विचारणा

Scanned by CamScanner

केली असता, मी त्यांना फक्त रु. ४,०००/– घेवुन आलो असल्याचे सांगितले. एपीआय पिठे यांनी माझेकडुन रु. ४,०००/– घेतले व मला पोलीस ठाण्यात बसण्यास सांगितले. व पोलीस ठाण्यात हजर असलेले अंमलदार यांना माझे विरुध्द असलेल्या गुन्हयातील कागदपत्रात योग्य त्या नोंदी घेण्यास सांगितल्या. त्यानंतर मला माझे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात अटक करुन तेथेच पोलीस ठाण्यात थांबवुन ठेवले. सुमारे दुपारी १२.४५ वा. च्या दरम्यान मला बांद्रा कोर्ट येथे नेत असतांना एपीआय पिठे साहेबांनी माझे जवळ येवुन मागणी केलेल्या २०,०००/– रुपयाच्या मागणीतील उर्वरित रक्कम आणुन देण्यात सांगितले. त्यानंतर मला बांद्रा कोर्टात हजर केले असता, १०,०००/– रुपयाचा जामीन मजुंर झाला. सदर दिवशी सुटटीचे न्यायालय असल्याने कोर्टाने जामीनाची रक्कम पोलीस ठाणेस भरण्यास सांगितली. त्यानंतर मला पुन्हा वाकोला पोलीस ठाणेस आणले. माझे वडीलांनी वाकोला पोलीस ठाणे येथे येवुन जामीनाची रक्कम १०,०००/– रुपये भरली व मला पैसे भरल्याची पावती दिली व घरी सोडले.

सायकांळी ६.३० वा. च्या सुमारास मला एपीआय पिठे साहेब यांचा फोन आला व त्यांनी मला फोनवरुन, "अली नावाचे इसमाचे घेतलेले रु. ३,००,०००/– त्यास ताबडतोब परत कर. नाहीतर तुझ्या विरुध्द केस दाखल करणार" असे बजावुन त्यांनी फोन बंद केला. त्यानंतर काहीवेळाने पुन्हा एपीआय पिठे साहेब यांनी मला फोन करुन वाकोला पोलीस ठाणेस येणार किंवा नाही अशी विचारणा केली. एपीआय पिठे यांनी मला "तुझे विरुध्द अजुन एक तक्रार आहे. तुझ्यावर दुसरी केस दाखल करतो अन्यथा राहिलेले पैसे दे" असे सांगितले. त्यावेळी मी माझेकडे सध्या पैसे नसल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी मला रात्री ०८.३० वा. वाकोला पोलीस ठाणेस येवुन भेटण्यास सांगितले.

मला एपीआय पिठे साहेब यांना लाच देण्याची अजिबात ईच्छा नसल्याने मी त्याच दिवशी दिनांक ०२/०८/२०१८ रोजी रात्रौ ०७.३० वाजता अँन्टी करप्शन मुंबईचे वरळी येथील कार्यालयामध्ये जावून एपीआय पिठे साहेबां विरुध्द तक्रार केली. मी केलेल्या तक्रारी प्रमाणे स.पो.आ. माने व पो.नि. दिपक जाधव यांनी मला माझ्या स्वःहस्ताक्षरात लेखी अर्ज लिहुन देण्यास सांगितला. मी माझी तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली. स.पो.आ. माने व पो.नि. दिपक जाधव यांनी माझे तक्रारीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. स.पो.आ. माने व पो.नि. दिपक जाधव यांनी दोन सरकारी पंचाना बोलावुन घेतले. त्यानंतर पंच व सापळा कारवाई पथकाची ओळख करुन दिली. पो.नि. दिपक जाधव यांनी त्यांच्या ताब्यात असलेला माझा दि. ०२/१२/२०१८ रोजीचा तक्रार अर्ज पंचासमक्ष वाचून, थोडक्यात समजावुन सांगितली. त्यांनतर पंचानी व पो.नि. जाधव यांनी स्वाक्षऱ्या केल्या. पो.नि. जाधव यांनी माझा तक्रार अर्ज पुढील कारवाईकरीता स्वतःच्या ताब्यात घेतला.

त्यानंतर आवश्यक ती कारवाई पूर्ण करून स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांच्या सुचनेप्रमाणे त्यांचेसह मी, दोन्ही पंच व सापळा पथक असे ब्युरो कार्यालयाचे समोरील मोकळया जागेत येवुन तेथे उभ्या असलेल्या वाहना जवळ आलो. तेथे पो.नि. जाधव यांनी मला व पंचास वाहन चालकांची ओळख करुन दिली. त्यांनतर मी पोलीस पथक व पंचासह दोन वाहनाने ब्युरोचे वरळी येथील कार्यालयातून निघून पश्चिम दुतगर्ती महामार्गाने सांताकुझ रेल्वे स्टेशन पूर्व येथे आलो. मी सांगितल्या प्रमाणे व पो.नि. जाधव यांच्या सुचनेप्रमाणे चालकांनी दोन्ही वाहने रस्त्याकडेला थांबवली. पो.नि. जाधव यांनी पुन्हा मला व पंचास सुचना दिल्या. त्यांचे सुचनेप्रमाणे पो.शि. कावले यांनी त्यांचेजवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये मायक्रो एस.डी.कार्ड घालुन व ते चालु करुन माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावुन, माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पंच श्री. गंगाराम लाळगे यांचेसह वाकोला पोलीस ठाणे येथे जावुन एपीआय पिठे साहेब यांची भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पंच श्री. लाळगे यांचेसह वाकोला पोलीस ठाणेस आलो. पोलीस अंमलदार कक्षात हजर असलेल्या एपीआय पिठे यांची रात्रौ ०१.१० वा. भेट घेतली. एपीआय पिठे यांनी मला थोडावेळ बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर एपीआय पिठे पोलीस ठाणेचे बाहेर आले व त्यांनी मला पोलीस ठाणेस समोर असलेल्या अधिकारी कक्षात बोलाविले. मी व पंच त्यांचे मागोमाग अधिकारी

Scanned by CamScanner

कक्षात आलो. त्यावेळी त्यांनी माझे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाबाबत पुन्हा चर्चा करुन माझेकडे पंधरा वीस हजार रुपयाची मागणी केली. मी त्यांना माझेकडे असलेले पैसे खर्च झाल्याचे सांगुन, उद्या पैशांचा बंदोबस्त करतो असे सांगितले. त्यावर त्यानी पैसे न दिल्यास तुझ्या विरोधात अजुन एक केस दाखल करणार असे सांगितले. त्यास मी होकार दिल्याने, त्यांनी मला सकाळी ०९.०० वा. पैसे घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच लाळगे असे पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. जाधव यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. मी स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन सभांषण ऐकले. त्यात एपीआय पिठे यांनी पैश्याची मागणी केल्याचे दिसुन आल्याने पुढील कारवाई संदर्भात योग्य त्या सुचना देवुन सर्व पथक, पंच व मी आल्यामार्गाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३/१२/२०१८ रोजी ०२.०० वा. पोहचलो. त्यानंतर माझे व पंचाचे समक्ष लोकसेवक व माझेतील संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट तयार करण्यात आली.

स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांचे सुचनेप्रमाणे मी सकाळी ११.०० वा. वाकोला पोलीस ठाणे जवळील गोळीबार रोडवरील आलो. त्यानंतर स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांच्या सुचने प्रमाणे मी एपीआय पिठे यांना माझे मोबाईलवरुन फोन केला. त्यावेळी एपीआय पिठे यांनी ते घरी पोहोचले असल्याचे सांगुन सध्याकाळी ०७.०० वा. पोलीस ठाणेस येवुन भेटण्यास येवुन सांगितले. त्यामुळे पुढील कारवाई संदर्भात पो.नि. जाधव यांनी योग्य त्या सुचना देवुन मला घरी जाण्यास सागुंन सर्व पथक, पंचासह आल्यामार्गाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात गेले.

त्यानंतर सायंकाळी ०८.३० वा. ठरल्याप्रमाणे मी गोळीबार रोड येथील ठरलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी स.पो.आ. माने व पो.नि. जाधव पोलीस पथक व पंचासह तेथे हजर होते. मी एपीआय पिठे यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी १०,०००/– रुपये आणल्याचे स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांना सांगितले. पो.नि. जाधव यांनी मी आणलेले लाचेची रक्कम १०,०००/– रुपये (दोन हजार रुपये किंमतीच्या ५ नोटा) ताब्यात घेतल्या. पो.नि. जाधव यांचे सुचनेप्रमाणे पो.शि. कावले यांनी मी दिलेल्या १०,०००/– रु.च्या (दोन हजार रुपये किंमतीच्या ५ नोटा) नोटांचे झेरॉक्स काढुन आणल्या. त्यावर पंचानी व पो.नि. जाधव यांनी स्वाक्षऱ्या केल्या. स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांनी पुन्हा मला व पंच लाळगे यांना सुचना दिल्या व पो.नि. जाधव यांच्याकडे दिलेली लाचेची रक्कम १०,०००/– रुपये पो.नि. जाधव यांनी चालक महारनुर यांचेकडे देवुन त्यास अन्थ्रासिन पावडर लावण्यास सांगितले. पो.नि. जाधव यांच्या सुचनेवरून पोलीस वाहनाचे चालक पो.शि.चा. महारनुर यांनी मला व पंचाना सदर पोलीस वाहनातच अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजाऊन सांगितले व मी दिलेल्या १०,०००/– रुपयाच्या दोन हजार किंमतीच्या ०५ भारतीय चलनी नोटांना अन्थ्रासिन पावडर लावली. वाहन चालक पो.शि.चा. महारनुर यांनी सदरची अन्थ्रासिन पावडर लावलेली रक्कम मी परिधान केलेल्या शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवली. पो.नि. जाधव यांनी सापळा कारवाईकरीता पुन्हा माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन लावला. त्यानंतर मी व पंच लाळगे असे वाकोला पोलीस ठाणे पर्यत चालत निघालो, त्यावेळी स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझ्या मागोमाग दुसरे पंच व सापळा पथक हे कोणासही संशय येणार नाही अशा स्थितीत चालु लागले. सर्व सापळा पंथक व पंच असे ठरल्याप्रमाणे वाकोला पोलीस ठाणे येथे पोहचल्यानंतर मी एपीआय पिठे साहेब यांना भेटण्यास गेलो. तेव्हा एपीआय पिठे हे मी ओळखत असलेल्या अली नावाचे इसमा बरोबर बोलत पोलीस ठाणेच्या समोरील मोकळया जागेत उभे होते. त्यावेळी मला पाहुन एपीआय पिठे यांनी थांबण्याचा इशारा केला. एपीआय पिठे यांच्या इशाऱ्या प्रमाणे मी त्यांचे पासुन काही अंतरावर थांबुन राहिलो. त्यावेळी संपूर्ण पथक आजुबाजुला थांबलेले होते. थोडयावेळा नंतर एपीआय पिठे हे पोलीस ठाणे समोरील अधिकारी कक्षाकडे निघाले. तेव्हा त्यांनी मला येण्याचा इशारा केला. मी व पंच श्री. लाळगे एपीआय पिठे यांच्या मागोमाग अधिकारी कक्षाच्या समोर आलो. तेव्हा एपीआय पिठे यांनी माझे सोबत असलेल्या पंचासह बाहेर थांबण्यास सांगुन, मला घेवुन अधिकारी कक्षात आले. अधिकारी कक्षात मी व एपीआय पिठे बोलत असताना दोन महिला कक्षात आल्या. त्यामुळे एपीआय पिठे यांनी मला थोडावेळ बाहेर थांबण्यास सांगितले. मी अधिकारी कक्षाचे बाहेर जावुन थांबलो. पाच ते दहा मिनीटात एपीआय पिठे हे दोन महिलासह बाहेर आले व त्यानी मला आत बसण्यास

Scanned by CamScanner

सांगितले. काही वेळोने एपीआय पिठे साहेब हे अधिकारी कक्षात आले. एपीआय पिठे यांनी मला अधिकारी कक्षातील बाथरुमच्या पाठीमागे नेवुन माझे बरोबर बोलु लागले. तेव्हा मी त्यांना तुम्ही वीस हजार मागितले होते पण माझ्याकडून दहा हजाराचीच व्यवस्था झाल्याचे मी त्यांना सांगितले. तेव्हा त्यांनी दे असे सांगितले. म्हणुन मी शर्टाच्या वरील खिश्यात ठेवलेले अन्थ्रासिन पावडर लावलेले दहा हजार रुपये उजव्या हाताने काढून त्यांचेकडे दिले. एपीआय पिठे यांनी ते त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन तात्काळ त्यांचे पॅटचे डाव्या खिश्यामध्ये ठेवले. मी एपीआय पिठे साहेबांना दहा हजार रुपये देताना माझे विरुध्द माझे मेव्हुनीने दिलेल्या केस बाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सहकार्य करण्याचे सांगितले.

एपीआय पिठे साहेबांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी व एपीआय पिठे अधिकारी कक्षाचे बाहेर येवुन थांबलो. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे पुर्व नियोजीत इशारा म्हणुन माझ्या हातातील घडयाळ काढुन दबा धरुन बसलेल्या सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना इशारा केला. त्यानंतर जवळचं असलेल्या पोलीस पथकाने तात्काळ एपीआय पिठे यांना तीन्ही बाजुने घेरले. व जागीच त्यांचे दोन्ही हात पकडून अटकावून ठेवले. त्यानंतर पो.नि. जाधव यांनी माझे शर्टाच्या आत बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. स.पो.आ. माने व पो.नि. जाधव यांनी एपीआय पिठे यांना स्वतःची व पथकाची ओळख करुन दिली व त्यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता एपीआय पिठे यांनी लाचेची रक्कम स्वतःच्या पॅटच्या डाव्या बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. जाधव यांनी तात्काळ दोन्ही पोलीस वाहनांना घटनास्थळी बोलावून घेतले व पुढील कारवाई पो.नि. जनसपर्क अधिकारी यांच्या रुम मध्ये करणार असल्याचे सांगितले. व तेथे पुढील सापळा कारवाई करण्यात आली.

एपीआय पिठे यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या–घेण्याचे व्यवहार नाहीत.

तरी एपीआय पिठे यांनी माझे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात सहकार्य करण्यासाठी माझ्याकडून रू. २०,०००/– ची लाचेची मागणी करुन त्यापैकी रू. १०,०००/– लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत करुन तो मी वाचून पाहिला तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

RAJU S.K

( दिपक जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned by CamScanner